# मेट्रो–३ भुयारीकरणाचा ३१वा टप्पा पूर्ण

## दीड किलोमीटरचे काम ४४९ दिवसांत; एकूण १०८० रिंग्सचा वापर


मेट्रो भुयारीकरणाचे पूर्ण झालेले काम

मुंबई, ता. २१ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गावर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सोमवारी (ता. २१) छत्रपती शिवाजी महाराज आंतरदेशीय विमानतळ (सीएसएमआयए टी- १) स्थानक येथे भुयारीकरणाचा ३१ वा टप्पा पूर्ण केला. पॅकेज- ६ च्या टेराटेक निर्मित तापी- १ या टनेल बोअरिंग मशीनद्वारे सहार ते सीएसएमआयए टी- १ पर्यंतचे १.५ किलोमीटर अंतर ४४९ दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले. यासाठी एकूण १०८० रिंग्सचा ऑवापर केला आहे.

'सीएसएमआयए टी- १ हे कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील सर्वांत महत्त्वाचे स्थानक असून, ते आंतरराष्ट्रीय व आंतरदेशीय विमानतळांना जोडले जाणार आहे. या स्थानकावरून दररोज एक लाखापेक्षा अधिक प्रवासी प्रवास करणे अपेक्षित आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची कोंडी कमी होण्यास मदत होईल. प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८७ टक्के भुयारीकरण आणि ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल म्हणाले.